MHPU170012152018

दाखल तारीख :- ०२/०७/२०१८
नोंदणी तारीख :- १२/०७/२०१८
निकाल तारीख :- २०/०६/२०२६
कालावधी :- ०७ व. ११ म. १८ दि.

## न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, इंदापूर, जि. पुणे यांचे न्यायालय

(पिठासीन अधिकारी एम. एच. फारुकी)

**नि.फौ ख. क्र.२९२/२०१८** **निशाणी क्र.४४**

| | |
|---|---|
| **महाराष्ट्र सरकार द्वारा**<br>इंदापूर पोलिस स्टेशन, इंदापूर<br>ता. इंदापूर, जि. पुणे. | **.... अभियोग पक्ष** |
| **– विरुध्द –** | |
| १) **निलेश शिवाजी मारकड**<br>वय– २७ वर्ष, व्यवसायः शेती,<br>रा. कौठळी, ता. इंदापुर, जि. पुणे.<br>२) **अजीत बयाजी शिंदे**<br>वय– २२ वर्ष, व्यवसायः शेती,<br>रा. बळपुडी, ता.इंदापुर,जि. पुणे | **.... आरोपीं** |

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | ०१/०६/२०१७ |
| पहिली खबर तारीख | ०२/०६/२०१७ |
| दोषारोपपत्राची तारीख | ०२/०७/२०१८ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | २०/११/२०२५ |
| पुराव्याला लागल्याची तारीख | ०६/०६/२०२६ |
| न्यायनिर्णयास राखीव तारीख | ---------- |
| न्यायनिर्णयाची तारीख | २०/०६/२०२६ |

| | |
|---|---|
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | -------- |

## आरोपींची माहिती

| आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | गुन्हयाचे कलम | शिक्षेस पात्र किंवा निर्दोष | शिक्षाधिन बंदीचा कालावधी UTP |
|---|---|---|---|---|---|
| **निलेश शिवाजी मारकड** | २१/०६/१७ | १२/०७/१७ | भा.दं.वि. कलम १४३,१४७, ३४१,३३७, ४२७ व ५०६ सह कलम ३४ महा.पो. अधि. कलम १३५ | निर्दोष | -- |
| **अजीत बयाजी शिंदे** | १२/०७/१७ | १२/०७/१७ | भा.दं.वि. कलम १४३,१४७, ३४१,३३७, ४२७ व ५०६ सह कलम ३४ महा.पो. अधि. कलम १३५ | निर्दोष | -- |

## सरकारी साक्षीदारांची यादी

| अनु.क्र. | नाव | नि.क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | गणेश सुरेश डमरे | ३८ | फिर्यादी |

## अभियोग पक्षाचे निशाणी क्रमांक

| अनु.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## बचाव पक्षाचे निशाणी क्रमांक

| अनु.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## न्यायालयाचे निशाणी क्रमांक

| अनु.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | २६ | दोषारोप |
| २. | २७ व २८ | आरोपी क्र. १ व ४ यांचे निवेदन |
| ३. | ३७ | फिर्यादी व आरोपीं यांनी दाखल केलेले संयुक्त तडजोड पुरशीस |

## भौतीक वस्तू

| अनु.क्र. | साहित्य नंबर | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**आरोपः- भारतीय दंड विधानाचे कलम १४३,१४७, ३४१,३३७, ४२७ व ५०६ सह कलम ३४ व महाराष्ट्र पोलीस अधिनियमाचे कलम १३५ अन्वये.**

सुविद्य सहा. सरकारी अभियोक्ता :- श्री. एम. डी. करे

बचाव तथा आरोपी पक्षातर्फे सुविद्य विधीज्ञ :- श्री. व्ही. एस. पारेकर

# न्यायनिर्णय

(दिनांक २० जुन, २०२६ ला घोषित)

१. सदरची केस आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम १४३,१४७, ३४१,३३७, ४२७ व ५०६ सह कलम ३४ व महाराष्ट्र पोलीस अधिनियमाचे कलम १३५ अन्वये च्या गुन्हयासाठी न्यायचौकशीस आहे.

२. **अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे-**

दिनांक ०१/०६/२०१७ रोजी फिर्यादी ट्रान्सपोर्टचा टाटा कंपनीचा ९०९ मॉडेलचा टेम्पो क्रमांक एम.एच.१२एफसी६४५७ मध्ये लाल मिरचीचे एकुण १०५ पोते घेवुन त्यांना ताडपत्री व दोरी बांधुन सोलापूर कडुन पुणेकडे एकटाच निघाला असताना रात्री ११.३० वाजताचे सुमारास वरकुडे पाटी येथील स्पीडब्रेकर जवळ आला असता त्याला १५ ते २० मुले रस्त्याच्या दोन्ही बाजुस थांबलेली दिसली. त्यातील काही मुलांनी फिर्यादीच्या अंगावर केळी फेकली. काहींच्या हातात कलींगड होते. काही मुलांनी टेम्पोची चावी काढुन घेतली. काहीजण टेम्पोच्या समोर येवुन थांबले. त्यावेळी फिर्यादी गाडीतुन उतरुन खाली आले असता ते फिर्यादीस म्हणाले की,'' पुण्याला माल घेवुन जायचा नाही, समजत नाही का तुला'' व टेम्पोच्या मागील बाजुच्या मालावरील दोरी तोडुन त्यातील आठ ते दहा पोते रस्त्यावर पाडले व मिरच्यांचे नुकसान केले. त्यावेळी पोलीसांची जीप येताना दिसल्याने ते सर्वजण पळु लागले. पोलीसांच्या जीपने त्यांचा पाठलाग केला. तेव्हा त्यांना पल्सर व प्लॅटीना नंबर नसलेल्या दोन मोटारसायकली मिळुन आल्य. त्यावरील स्वार अंधारात पळुन गेले. त्यावेळी पोलीसांना पांढरे रंगाचा टचस्क्रीनचा मोबाईल मिळुन आला. तसेच वरकुडी पाटी वर फिर्यादीचे आधी टाटा ४०७ टेम्पो क्र.एमएच१३जी१५२२ ची काच फोडुन नुकसान केले होते. त्याचा चालक नितीन सोमनाथ सुर्यवंशी व प्रवाशी रमेश हरीदास सुर्यवंशी यांना लागल्याचे समजले होते.

३. खबरीच्या आधारे इंदापूर पोलीस स्टेशन येथे अपराध क्र. ३५३/२०१७ नोंदविण्यात आला. त्यानंतर तपासीक अंमलदार डी.एस.कुलकर्णी यांनी प्रकरणाचा पुढील तपास पूर्ण करीत आरोपीं विरुध्द अंतिम अहवाल या न्यायालयासमोर सादर केला.

४. आरोपी क्र.१ व २ यांच्या विरूध्द निशाणी क्र.२६ वर दोषारोप ठेवला व त्यांना समजावून सांगितला असताच त्यांनी निवेदन अनुक्रमे निशाणी क्र. २७ व २८ प्रमाणे गुन्हा नाकबूल करून केस चालविण्याची विनंती केली.

५. संपरिक्षेदरम्यान, अभियोग पक्षाने एकाच साक्षीदारचा तोंडी पुरावा या न्यायालयासमोर सादर केला. आरोपीं व फिर्यादीमध्ये न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झाल्याने तसी संयुक्त पुरसीस निशाणी क्रं.३७ वर दाखल करण्यात आली व त्याप्रमाणे अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. त्याउलट बचाव पक्षाने कोठलाही शाब्दिक वा कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. आरोपी क्र.१ व २ यांचे स्पष्टीकरणात्मक फौजदारी प्रक्रिया संहिता,

१९७३ च्या कलम ३१३ प्रमाणेचे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

**६.** त्यानंतर संपरिक्षेच्या शेवटच्या टप्प्यांत मी सुविद्य सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एम.डी.करे यांचा युक्तिवाद ऐकला आणि बचाव पक्षातर्फे आरोपीचे सुविद्य विधीज्ञ श्री. व्ही. एस. पारेकर यांचा युक्तिवाद ऐकला.

**७.** या संपूर्ण पार्श्वभुमीवर, माझे समोर निर्णयाकरिता पुढील विचाराधीन प्रश्न उदभवलेत. या प्रश्नांना मी, त्याखालील नमुद कारणमीमांसेच्या बळावर तसेच अभिलेखी उपलब्ध पुराव्याचे आधारे, आज रोजी माझे निष्कर्ष नोंदविलेले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| **१.** | दिनांक ०१/०६/२०१७ रोजी रात्री ११.३० वाजताच्या दरम्यान मौजे वरकुटे बु., ता. इंदापूर, जि. पुणे येथील पुणे–सोलापूर महामार्गावरील रोडवर वरकुटे पाटी येथे रस्त्यावर आरोपीं क्र. १ व २ तसेच इतर १५ ते १८ अनोळखी साथीदार असे समान उद्देशाच्या पुरःसरनार्थ, फिर्यादी व साक्षीदार यांचे वर हमला करण्यासाठी बेकायदेशीर जमाव जमविला व भारतीय दंड संहितेचे कलम १४३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | **नाही** |
| **२.** | वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी आरोपीं क्र. १ व २ तसेच इतर १५ ते १८ अनोळखी साथीदार असे समान उद्देशाच्या पुरःसरनार्थ सदर सार्वजनिक रस्त्यावर बेकायदेशीर जमाव जमविला आणि त्या जमावाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी बलप्रयोग करून दंगा केला व भारतीय दंड संहितेचे कलम १४७ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | **नाही** |
| **३.** | वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी आरोपीं क्र. १ व २ तसेच इतर १५ ते १८ अनोळखी साथीदार असे समान उद्देशाच्या पुरःसरनार्थ सार्वजनिक रोडवर फिर्यादीस त्याचे ताब्यातील टेम्पो वाहन क्र.एम.एच.१२–एफ.सी.६४५७ सह तसेच व साक्षीदार नितीन सोमनाथ सुर्यवंशी यांना टेम्पो वाहन क्र.एम.एच.१३–जी.१५२२ | **नाही** |

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | सह जात असतांना त्यांची अडवणुक करुन त्यांना गैर परिरोध केले व भारतीय दंड संहितेचे कलम ३४१ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | |
| ४. | वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपीं क्र. १ व २ तसेच इतर १५ ते १८ अनोळखी साथीदार असे समान उद्देशाच्या पुरःसरनार्थ दगड जे की, बेदरकारपणे व निष्काळजीपणाने मानवी जीव धोक्यात येईल किंवा व्यक्तीगत सुरक्षा धोक्यात येईल असे साक्षीदार नामे नितीन सुर्यवंशी यांच्या कपाळावर फेकून त्यांना साधी दुखापत पोहोचविली व भारतीय दंड सहितेचे कलम ३३७ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही |
| ५. | वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी आरोपीं क्र. १ व २ तसेच इतर १५ ते १८ अनोळखी साथीदार असे समान उद्देशाच्या पुरःसरनार्थ फिर्यादीच्या ताब्यातील वाहन क्र.टेम्पो वाहन क्र.एम.एच.१२–एफ.सी.६४५७ मधील मिरचीचे ८–१० पोत्यांचे तसेच साक्षीदार नितीन सुर्यवशी यांच्या ताब्यातील टेम्पो वाहन क्र.एम.एच.१३–जी.१५२२ याचे काचा फोडून फिर्यादी व साक्षीदार यांचे अंदाजे रक्कम रु.५०/– पेक्षा अधिक रक्कमेचे नुकसान करुन अगळीक केले व भारतीय दंड सहितेचे कलम ४२७ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही |
| ६. | वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपीं क्र. १ व २ तसेच इतर १५ ते १८ अनोळखी साथीदार असे समान उद्देशाच्या पुरःसरनार्थ फिर्यादी व साक्षीदार यांना फौजदारीपात्र धाकदपटशा करत दहशत निर्माण केली व दमदाटी केली व भारतीय दंड सहितेचे कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही |
| ७. | वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपीं क्र. १ व २ तसेच इतर १५ ते १८ अनोळखी साथीदार असे समान उद्देशाच्या | नाही |

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | पुरःसरनार्थ, मा. जिल्हाधिकारी सो. पुणे यांचा महाराष्ट्र पोलीस अधिनियमाचे कलम ३७ (३),१ अन्वये जारी केलेल्या आदेशाचा भंग केला व महाराष्ट्र पोलीस अधिनियमाचे कलम १३५ अन्वये गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | |
| ८. | काय आदेश? | **आरोपीं दोषमुक्त** |

## !! का र ण मी मां सा !!

८. सरकार पक्षाने आपले म्हणणे सिध्द करण्यासाठी वरील नमुद एकच साक्षीदाराचा तोंडी पुरावा न्यायालयात सादर केला. त्याउलट आरोपींतर्फे कुठलाही शाब्दीक व कागदोपत्री पुरावा दाखल करण्यात आला नाही.

**मुद्दे क्रमांक १ ते ७ बाबत:**

९. फिर्यादीने आपल्या पुराव्यात असे कथन केले आहे की, तो आरोपींना ओळखतो, कारण त्यांची भाडे वाहतुकीमुळे ओळखत आहे. फिर्यादीला घटनेबाबत काहीही आठवत नाही. त्याची व आरोपींची गाडीचे भाडेचे कारणावरुन किरकोळ शाब्दीक बाचाबाची झाली या व्यतिरिक्त काहीही घडलेले नाही. तो मोटारसायकल चालवित असतांना पडल्याने त्याला लागले होते. तो रागाच्या भरात पोलीस स्टेशनला जावुन फिर्याद दिली होती. त्यास अभिलेखावरील दि.०२/०६/२०१७ रोजीची फिर्याद व प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आले, त्यावरील सह्या त्याचे असल्याचे त्याने मान्य केले परंतु त्यातील मजकुराबाबत काहीही माहिती नसल्याचे सांगितले आहे.

१०. तसेच सदर साक्षीदाराने आरोपींतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्याने नाकारले की, दि.०१/०६/२०१७ रोजी ट्रान्सफोर्टचा टाटा कंपनीची ९०९ मॉडेलचा टेम्पो क्र.एम.एच.१२–एफ.सी.६४५७ घेवून सोलापूर येथून पुणेकरीता सायंकाळी निघाला. सदर टेम्पोमध्ये वाळलेल्या लाल मिरचीचे एकूण १०५ पोती होती व गाडीस ताडपत्री बांधलेली होती, त्यावेळी सदर टेम्पो तो एकटाच चालवित होता. सोलापूर–पुणे महामार्गावरील वरकुटे पाटील येथील गतीरोधक जवळ आला असता त्याला १५ ते २० मुले रस्त्याच्या दोन्ही बाजुस

दिसली, त्यावेळी रात्री ११.३० वाजले होते व गाडी गतीरोधकवरुन मंद गतीने जातांना रस्त्याच्या बाजुला थांबलेली काही मुलांनी त्याचे अंगावर केळी फेकली तसेच काही जाणांच्या हातात कलिंगडे होते, चार–पाच जण टेम्पोसमोर थांबले व काहींनी टेम्पोची चावी काढली, त्यामुळे तो खाली उतरला असता सदर लोकांनी त्यास म्हणाले की, ''पुण्याला माल घेवुन जायचा नाही, समजत नाही का'' असे म्हणून टेम्पोची मागील बाजुची मालावरील दोरी तोडून त्यातील ८–१० पोती रस्त्यावर पाडले तसेच मिरचीचे सुध्दा नुकसान केले, तेंव्हा इंदापूर बाजुने पोलीस जीप येतांना दिसल्याने सदर लोक पळू लागले, त्यावेळी सदर लोक हे मोटारसायकलवरुन पळून जात असतांना पोलीसांनी त्यांचा पाठलाग करुन परंतू ते पळून गेले, त्यांच्या ताब्यातील प्लसर व प्लॅटीन तसेच एक मोबाईल मिळून आले, त्यानंतर सदर लोकांपैकी आरोपी क्र.१ व २ यांची नावे समजले, त्यानंतर त्याने आरोपींच्या विरुध्द फिर्याद दिली. तसेच त्याने मान्य केले की, आरोपीं हे त्याचे ओळखीचे असल्याने त्याच्यामध्ये व आरोपींमध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झालेली आहे. तशी संयुक्तीक पुरशीस नि.३७ वर दाखल केली आहे.

१०. स्वतः तक्रारदारनेच अभियोग पक्षाच्या कथनास दुजोरा न देणे यामुळे आरोपीं विरूद्ध दोषारोपीत करण्यात आलेले गुन्हे की, घटनेच्या वेळी फिर्यादी त्याचा टेम्पो घेवुन सोलापुरहुन पुणेकडे मिरचीचे पो घेवुन जाताना वरकुडे पाटी येथे आरोपींनी त्याची गाडी रस्त्यावर आडवनुक करुन त्याचे अंगावर केळी फेकली. त्याच्या गाडीची चावी काढुन टेम्पोसमोर येवुन थांबले व 'तु पुण्याला जायचे नाही' असे म्हणुन त्याच्या टेम्पोमधील मिरचीची ८ ते १० पोते रस्तयावर पाडुन मिरचीचे नुकसान केले. हा गुन्हा सिद्ध करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे. सबब, मी मुद्दे क्र.१ ते ७ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ८ बाबत:–</u>**

११. वरील चर्चेवरून असे स्पष्ट होते की, एकतर फिर्यादीने त्याचे साक्षीमध्ये जे सांगीतले ते कथन खोटे आहे किंवा त्यांनी पोलीसांसमक्ष दिलेला जबाब खोटा आहे. सामान्यतः अशा परिस्थीतीमध्ये फिर्यादीने असे केल्यावर त्याच्यावर कोर्टात खोटी साक्ष दिल्याच्या गुन्हासाठी कार्यवाही झाली असती परंतु, निशाणी क्र.३७ वर तडजोड पुरसीसदेखील दाखल करण्यात आली व त्यात फिर्यादीने मान्य केले आहे की आरोपीं व फिर्यादी यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झालेली आहे व त्यामुळे फिर्यादीची आरोपींविरूध्द कोणतीही तक्रार नाही. सबब, मी फिर्यादीस खोटी साक्ष देण्याचे गुन्हयासाठी जबाबदार धरत

नाही. अशाप्रकारे, आरोपीं सदर गुन्हयातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब मुददा क्रमांक ८ करिता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## – आ दे श –

१. आरोपी क्र.१ **निलेश शिवाजी मारकड** व क्र.२ **अजीत बयाजी शिंदे** यांना फौजदारी प्रक्रिया संहिताच्या कलम २४८(१) प्रमाणे भारतीय दंड विधानाचे कलम १४३,१४७, ३४१,३३७, ४२७ व ५०६ सह कलम ३४ व महाराष्ट्र पोलीस अधिनियमाचे कलम १३५ अंतर्गत दंडनीय अपराधातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपींचे बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ अन्वये पुर्तता करणेकामी त्यांचे स्वबंधपत्र प्रत्येकी रूपये १५,०००/– रुपये इतके दिले.

Digitally signed by MUJAHEDUL HAQUE HAFEEZUL HAQUE FAROOQUI
Date: 2026.06.20 18:59:30 +0530

(**एम. एच. फारुकी**)

दिनांक: २०/०६/२०२६

न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
इंदापूर, जि. पुणे.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno. | :- | Smt. P. D. Kadam (Stenographer-3) |
| Court Name | :- | Shri. M.H. Farooqui,<br>Civil Judge (Jr. Dn.) and J.M.F.C., Indapur, Dist. Pune. |
| Date | :- | 20/06/2026 |
| Order signed by the presiding officer on | :- | 20/06/2026 |
| Order uploaded on | :- | 20/06/2026 |